


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १७ • बुधवार दि.७ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## 'ज्ञानेश हटावो,लोकशाही बचावो'च्या घोषणाबाजीत इंडिया आघाडीची वज्रमूठ

नांदेड/प्रतिनिधी-मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी भाजपा निवडणूक जिंकण्यासाठी वेळोवेळी काम केले आहे हे आता सिद्ध झाले आहे. ज्ञानेश कुमार यांनी मनमानी कारभार करत गैर पद्धतीने एसआयआर मोहीम राबवली आहे. जो पर्यंत ज्ञानेश कुमार राजिनामा देत नाही, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहिल असे ठाम प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी महामोर्चा दरम्यान केले.



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्यासह एसआयआर रद्द करा व निवडणूका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे घ्या या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यांसाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शिवसेना (उबाठा), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, आम आदमी पार्टीसह इंडिया आघाडीच्या वतीने बुधवार (ता.७) रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान महामोर्चा काढण्यात आला. यावेळी खा. रवींद्र चव्हाण हे बोलत होते. ज्ञानेश कुमार हटावो, लोकशाही बचावो अशी प्रचंड घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. यावेळी काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, माधवराव पाटील जवळगावकर, रोहीदास चव्हाण, काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, प्रा. यशपाल भिंगे, सुरेशदादा गायकवाड, डॉ. श्रावण रॅपनवाड, तिरुपती पाटील कोंडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ॲड.कॉ.प्रदिप नागापूरकर, सीपीएमचे कॉ.विजय गाभणे, तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, सतीश उमरेकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, सीपीएमचे विनोद गोविंदवार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, पुरोगामी वकील संघाचे ॲड.एम.झेड.सिद्दीकी, ॲड.बारी सिद्दीकी, मनोज यादव, पान ४ वर

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना आंदोलनाचा अधिकार
### शासन व याचिकाकर्त्यांना हायकोर्टाच्या कानपिचक्या

पुणे:पुणे हे विद्येचे माहेरघर असून, देशभरातून येथे शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी मोठ्या संघर्षातून आपले करिअर घडवत असतात. त्यामुळे विद्यार्थी रस्त्यावर उतरण्याची हौस म्हणून आंदोलन करतात, असे मानता येणार नाही. विद्यार्थी हे समाजकंटक नाहीत. परीक्षेत काही घोळ झाला असेल तर त्याविरोधात आंदोलन करण्याचा त्यांना अधिकार आहे, अशा शब्दांत मुख्य न्यायाधीश महेश चंद्र त्रिपाठी यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलना विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना याचिकाकर्त्यांना खडेबोल सुनावले. व परीक्षा पारदर्शक पध्दतीने घ्यावयात अशा सुचना केल्या आहेत.

पुण्यातील अमित सुपेकर आणि सौरभ विरकर यांनी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणीदरम्यान न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या हक्काबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदविले. भरती प्रक्रियेत काही गैरप्रकार किंवा घोळ झाला असेल, तर त्याविरोधात आंदोलन करण्याचा विद्यार्थ्यांना अधिकार आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. विद्यार्थ्यांवर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत का, अशी विचारणा न्यायालयाने केली असता, विद्यार्थ्यांचे करिअर धोक्यात येऊ नये म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले नाहीत, असे सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले. एमपीएससीच्या परीक्षा अत्यंत पान ४ वर

## ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्यास विलंब;महसूल सहायकासह सहायक महसूल अधिकारी निलंबित
### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची कठोर कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र निर्गमित करण्यास विनाकारण विलंब केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कठोर कारवाई केली आहे. बिलोली तहसील कार्यालयातील महसूल सहाय्यक सी.पी. धर्मेकर आणि सहाय्यक महसूल अधिकारी एन.व्ही. पाळेकर यांना तातडीने सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

बिलोली तालुक्यातील आदमपूर येथील रहिवासी कार्तिक काशिनाथ पांडे यांनी दि. २८ जून २०२६ रोजी महाऑनलाईन प्रणालीद्वारे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. मागणी केलेले प्रमाणपत्र विहित मुदतीत देणे बंधनकारक असतानाही संबंधितांकडून त्यास विलंब झाला. त्यानंतर दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले. प्रमाणपत्र देण्यास विनाकारण विलंब करून शासकीय कामकाजात दिरंगाई व निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित महसूल सहाय्यक व सहाय्यक महसूल अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. शासकीय सेवा व विविध प्रमाणपत्रांच्या कामकाजात नागरिकांना अनावश्यक विलंब होऊ नये, यासाठी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विहित कालमर्यादेत कार्यवाही करावी, असे निर्देश पान ४ वर

## जिल्ह्यातील काही पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

नांदेड/प्रतिनिधी-पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी नांदेड जिल्ह्यातील काही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे दबंग पोलीस अधिकारी ओमकांत चिंचोलकर यांची प्रकृतीच्या कारणावरुन पोलीस नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. विमानतळ सुरक्षा विभागाचे पोलीस निरीक्षक सुभाष उन्हाळे यांची नायगाव पोलीस स्टेशन येथे तर नायगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी पो.नि.अमोल भगत यांची अर्धापूर येथे बदली करण्यात आली. अर्धापूर पोलीस स्टेशनचे पो.नि.महादेव मांजरमकर विमानतळ सुरक्षा विभागात तर नियंत्रण कक्षातील पो.नि.गणेश कराड यांची मुदखेड पोलीस ठाण्यात बदली झाली आहे. मुदखेडच्या पोलीस निरिक्षकांना पोलीस नियंत्रण कक्षात पाचारण करण्यात आले आहे.

## महाज्योतीच्या स्कॉलरशिप परीक्षाही अखेर रद्द
### संगणक उपलब्ध नसल्याने आंबेगावच्या केंद्रावर गोंधळ!

पुणे:महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) स्कॉलरशिप परीक्षेच्या नियोजनाचा बुधवारी पुण्यात बोजवारा उडाल्याचे समोर आले. आंबेगाव बुद्रुक परिसरातील सन ब्राईट स्कूल परीक्षा केंद्रावर आवश्यक संगणक उपलब्ध नसल्याने परीक्षा निर्धारित वेळेत सुरू होऊ शकली नाही. तब्बल दोन तास प्रतीक्षा करूनही परीक्षा देता न आल्याने विद्यार्थिनींमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. अखेर परीक्षा रद्द करण्यात आली.

महाज्योतीच्या वतीने बुधवारी (७ ऑक्टोबर) स्कॉलरशिप परीक्षा नियोजित करण्यात आली होती. सकाळी ९ ते ११ या वेळेत परीक्षा होणार असल्याने विद्यार्थिनी आवश्यक तयारी करून वेळेत परीक्षा केंद्रावर दाखल झाल्या होत्या. मात्र, परीक्षा केंद्रावर ऑनलाइन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक संगणक आणि इतर तांत्रिक सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप विद्यार्थिनींनी केला. परीक्षेची निर्धारित वेळ सुरू होऊनही परीक्षा सुरू झाली नाही. विद्यार्थिनींना केंद्राबाहेरच बराच वेळ थांबावे लागले. परीक्षा सुरू होईल, या अपेक्षेने विद्यार्थिनी तब्बल दोन तास प्रतीक्षा करत राहिल्या. मात्र, अखेर परीक्षा घेणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्याने विद्यार्थिनींसह पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, परीक्षा रद्द झाल्यानंतर आमदार रोहित पवार यांनी या प्रकारावरून पान ४ वर

## सोमेश्वर शिवारात रेतीचा अवैध साठा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-सोमेश्वर शिवारात अवैधरित्या नदी पात्रातून रेती उपसा करुन ठेवलेला साठा लिंबगाव पोलीसांनी मंगळवारी जप्त केला आहे.



पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली लिंबगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बोधनकर व पोलीस कर्मचारी हे गस्त घालत असताना सोमेश्वर शिवारातील नदी ब्रीज जवळ अवैध रेती उत्खनन करुन साठा करुन ठेवल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता त्या ठिकाणी दीड लाख रुपये किंमतीची ३० ब्रास रेती साठा आढळून आला. पोलीसांनी सदरील रेती जप्त केली आहे. याप्रकरणी सतीश प्रभु बोकारे रा.सोमेश्वर याच्या विरुध्द लिंबगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मळणी यंत्राच्या भीषण धडकेत मेदनकल्लूरच्या दोघांचा जागीच मृत्यू

देगलूर/प्रतिनिधी-घरातील कामानिमित्त 'दुचाकीवरून बाहेर पडताना काम आटोपून थोड्याच वेळात घरी येतो' असे सांगून निघालेले दोघेही घरी परतलेच नाहीत. तमलूरकडून नरंगलच्या दिशेने जाणाऱ्या हायवेवर येणाऱ्या दुचाकीला सोयाबीन कापणी व मळणी करणाऱ्या यंत्र घेवून जाणाऱ्या वाहनाने धडक दिल्याने या भीषण अपघातात दोन जण जागीच ठार झाल्याची घटना मंगळवार दि.६ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता घडली आहे.

या अपघातात सिद्धी खदीर सिद्धी मोईन (वय ४४) शेख फैजान शेख इस्माईल (वय २४), दोघेही रा. मेदनकल्लूर ता. यांचा मृत्यू झाला. एम एच-२६ डीबी-४३०३ क्रमांकाच्या दुचाकीवरून मेदनकल्लूरहुन तमलूर-नरंगल हायवेकडे जात होते. त्याचवेळी तमलूरकडून नरंगलकडे जाणाऱ्या सोयाबीन कापणी व मळणी करणाऱ्या मोठ्या यंत्राची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. धडक एवढी भीषण होती की दोघेही रस्त्यावर कोसळले. डोक्याला गंभीर दुखापती झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. काही वेळात घरी परतण्याचे आश्वासन देऊन घराबाहेर पडलेले दोघे कायमचे दूर गेल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. 'थोड्याच वेळात येतो'हेच त्यांचे अखेरचे शब्द ठरले. या घटनेने संपूर्ण मेदनकल्लूर परिसर सुन्न झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच गावकरी व वाहनधारकांनी ११२ वर संपर्क साधला. देगलूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश ओटे, पोलीस उपनिरीक्षक किरण बेंबडे, जमादार मोहन कणकवळे, बळीराम घुले यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दोन्ही मृतदेह देगलूर उपजिल्हा रुग्णालयात सेवा-विच्छेदनासाठी पाठविले आहे. घरातून निघतानाच निरोप शेवटचा ठरेल, याची कल्पनाही नव्हती, काही तासातच दोन कुटुंबांचा आधार हिरावला गेल्याने मेदनकल्लूरमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## फी माफीची 'भीमगर्जना',हमीपत्राचा अडसर!
### मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनंतरही विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम;'भीक नको पण कुत्रा आवर'म्हणण्याची वेळ

नांदेड/प्रतिनिधी-दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली घोषणा विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा मानली जात होती. मात्र, प्रत्यक्षात शुल्कमाफीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेतले जात असल्याने या घोषणेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घोषणा मोठी, पण लाभ घेण्यासाठी अटींचा अडसर, अशी परिस्थिती निर्माण झाल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड संभ्रम पसरला आहे.

दुष्काळामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरणेही जड जात आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्कमाफी जाहीर केली. मात्र, त्यासाठी विद्यार्थ्यांनी इतर कोणत्याही शासकीय शैक्षणिक सवलतीतून परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती घेतलेली नाही, अशी घोषणा करणारे हमीपत्र द्यावे लागत असल्याने नव्या प्रश्नांना तोंड फुटले आहे.विशेषतः शिष्यवृत्ती, फ्रीशिप किंवा अन्य शासकीय शैक्षणिक सवलतींचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या अटीचा नेमका अर्थ काय, हे समजेनासे झाले आहे. शिष्यवृत्तीचा लाभ घेतला म्हणून परीक्षा शुल्कमाफी नाकारली जाणार आहे का? की केवळ त्याच परीक्षा शुल्काची दुहेरी प्रतिपूर्ती रोखण्यासाठी हमीपत्र घेतले जात आहे? याचे स्पष्ट उत्तर शासनाकडून मिळालेले नाही.मुख्यमंत्र्यांनी केलेली शुल्कमाफीची घोषणा आणि प्रत्यक्षात विद्यार्थ्यांसमोर ठेवलेले हमीपत्र यातील तफावत आता चर्चेचा विषय बनली आहे. शासनाने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला असेल, तर तो कोणत्याही संदिग्ध अटींशिवाय स्पष्टपणे लागू होणे अपेक्षित आहे. अन्यथा एका हाताने सवलत जाहीर करून दुसऱ्या हाताने अटींचे ओझे टाकल्याचा संदेश विद्यार्थ्यांमध्ये जाऊ शकतो.

**घोषणेचा लाभ की अटींचा गुंता?**

दुष्काळग्रस्त भागातील अनेक विद्यार्थी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांतून येतात. अशा विद्यार्थ्यांसाठी काहीशे रुपयांची परीक्षा फीही महत्त्वाची ठरते. त्यामुळे शुल्कमाफीची घोषणा त्यांच्या दृष्टीने आशेचा किरण ठरली. मात्र हमीपत्रातील अटी पाहून अनेक पालक आणि विद्यार्थी संभ्रमात पडले आहेत. फी माफी जाहीर केली, पण ती मिळविण्यासाठी पुन्हा कागदपत्रे, हमीपत्रे आणि अटींचा सामना का? असा सवाल पालकांकडून उपस्थित केला जात आहे. यामुळे काही पालक आणि विद्यार्थ्यांवर भीक नको पण कुत्रा आवर अशी म्हणण्याची वेळ आल्याची पान ४ वर

## भारतीय महिला क्रिकेट कर्णधारपदी स्मृती मंधाना

मुंबई/प्रतिनिधी-भारतीय महिला क्रिकेट संघाच्या नेतृत्वात मोठा बदल झाला आहे. माजी कर्णधार हरमनप्रीत कौरने



तीनही फॉरमॅटमधील कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर बीसीसीआयने टीम इंडियाची धुरा स्मृती मंधानाकडे सोपविली आहे. आता स्मृती कसोटी, वनडे आणि टी-२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

स्मृती यापूर्वी भारतीय संघाची उपकर्णधार होती. तसेच विविध फॉरमॅटमध्ये तिने नेतृत्वाची जबाबदारी सांभाळली आहे. तिच्या नेतृत्वाखाली रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने २०२४ मध्ये महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद पटकावले होते. बीसीसीआयने स्मृतीच्या अनुभवावर विश्वास व्यक्त करताना भारतीय महिला क्रिकेट नव्या पर्वात प्रवेश पान ४ वर

# एवढे भय कशामुळे?

देशाच्या अनेक भागांवर दुष्काळाचे सावट आहे. महाराष्ट्रातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे; मात्र देशाच्या राजकारणात आंदोलनांचा पाऊस सुरू आहे. विद्यार्थी, शेतकरी, कामगार, सामाजिक संघटना आणि आता प्रमुख विरोधी पक्षही रस्त्यावर उतरले आहेत. लोकशाहीमध्ये आंदोलने ही अस्वस्थतेची अभिव्यक्ती असतात. जनतेचे प्रश्न ऐकण्याऐवजी आंदोलनकर्त्यांनाच संशयाच्या नजरेने पाहिले जाऊ लागले, तर लोकशाहीच्या आरोग्याबद्दल प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. आजचा सर्वात गंभीर प्रश्न निवडणूक प्रक्रियेभोवती निर्माण झालेल्या संशयाचा आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून देशातील विविध राज्यांमध्ये मतदार पुनर्परीक्षण अभियान अर्थात एसआयआर राबविले जात आहे. महाराष्ट्रातही ही प्रक्रिया सुरू आहे. एसआयआर ही काही स्वातंत्र्यानंतर प्रथमच होत असलेली प्रक्रिया नाही. यापूर्वीही मतदार याद्यांचे पुनर्परीक्षण झाले आहे. त्यामुळे या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना अज्ञान ठरविणे किंवा त्यांची खिल्ली उडविणे हा समस्येवरचा उपाय नाही.२०१९ नंतर आयोगाच्या एसआयआर प्रक्रियेबाबत विविध आक्षेप उपस्थित झाले. मतदार यादीतून संभाव्य वगळण्यात येणारी नावे, प्रक्रियेची पारदर्शकता आणि निर्णय प्रक्रियेबाबत प्रश्न विचारले गेले. प्रश्न विचारणाऱ्यांना समजावून सांगण्याऐवजी सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि आयोगाकडून त्यांच्यावरच टीकेचा भडिमार झाला. पण लोकशाहीत प्रश्न दाबून प्रश्न संपत नाहीत. उलट ते अधिक मोठे होतात. एका इंग्रजी दैनिकाने निवडणूक आयोगाच्या अंतर्गत कामकाजाबाबत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर वृत्त प्रसिद्ध केले. या वृत्तानंतर आयोगाने बैठक घेऊन निर्णय सर्वसंमतीने होत असल्याचे स्पष्ट केले. आयोगाला आपली भूमिका मांडण्याचा अधिकार आहे; परंतु देशाला अपेक्षित होते ते केवळ अंतर्गत बैठकीचे स्पष्टीकरण नव्हे, तर सार्वजनिक पारदर्शकता.जर आयोगातील सर्व निर्णय खरोखर सर्वसंमतीने होत असतील, तर मग मुख्य निवडणूक आयुक्तांसह अन्य आयुक्तांनी पत्रकारांसमोर येऊन देशाच्या प्रश्नांना सामोरे जाण्यास काय हरकत होती? पत्रकार परिषद ही काही न्यायालयीन चौकशी नाही. प्रश्नांना उत्तरे देणे म्हणजे आयोगाची प्रतिष्ठा कमी होणे नव्हे. उलट संवैधानिक संस्थेची विश्वासार्हता वाढविण्याची ती संधी असते. मात्र ती संधी नाकारली गेली आणि संशयाचे ढग आणखी गडद झाले. या सगळ्याचा कळस काल दिल्लीत इंडिया आघाडीच्या आंदोलनाने झाला. विरोधी पक्षाचे नेते निवडणूक आयोगाच्या कार्यालयात चर्चा करण्यासाठी जात असताना त्यांना रोखण्यात आले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनाही आयोगाच्या कार्यालयात जाण्यापासून अडविण्यात आले आणि अखेरीस ताब्यात घेण्यात आले. हा प्रकार केवळ एका राजकीय नेत्याला रोखण्यापुरता मर्यादित नाही. हा प्रश्न आहे, निवडणूक आयोगाला प्रश्न विचारण्यासाठी जाणाऱ्या विरोधकांनाही प्रवेश नाकारण्याची वेळ का आली? आयोगाने विरोधकांना बोलवून त्यांचे म्हणणे ऐकले असते, कागदपत्रे समोर ठेवली असती आणि प्रत्येक आक्षेपाचे उत्तर दिले असते तर कदाचित आंदोलनाची गरजच भासली नसती. लोकशाहीमध्ये संवादाचे दरवाजे बंद झाले की रस्ते खुले होतात. रस्त्यावर उतरलेल्या जनतेला दडपण्यापेक्षा तिच्या प्रश्नांची उत्तरे देणे अधिक सोपे असते. आज प्रश्न एसआयआरचा तेवढाच नाही. प्रश्न आहे निवडणूक प्रक्रियेवरील जनतेच्या विश्वासाचा. निवडणूक आयोग हा कोणत्याही सरकारचा विभाग नाही; तो संविधानाने निर्माण केलेला स्वतंत्र प्रहरी आहे. त्यामुळे त्याच्याकडून सत्ताधाऱ्यांपेक्षा अधिक पारदर्शकता आणि विरोधकांपेक्षा अधिक संयम अपेक्षित आहे. आयोगावर प्रश्न उपस्थित झाले की त्याचे उत्तर कारवाईतून नव्हे, तर तथ्यांतून मिळाले पाहिजे. सत्ताधाऱ्यांना विरोधकांची भीती वाटू शकते, पण निवडणूक आयोगाला कोणाची भीती असावी? प्रश्न विचारणाऱ्या राहुल गांधींची? आंदोलन करणाऱ्या इंडिया आघाडीची? पत्रकारांची? की मतदारांची? लोकशाहीत प्रश्न विचारणे हा अपराध नाही आणि प्रश्न विचारणाऱ्याला ताब्यात घेणे हे उत्तर नाही. म्हणूनच देश आज विचारत आहे, एवढे भय कशामुळे? मतदार याद्या स्वच्छ असतील तर त्या दाखवा. प्रक्रिया निष्पक्ष असेल तर तिचे पुरावे द्या. निर्णय सर्वसंमतीने होत असतील तर ती सर्वसंमती देशासमोर मांडा. आयोग निष्पक्ष असेल तर विरोधकांच्या प्रश्नांना सामोरे जा.कारण निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नाही; ती भारतीय लोकशाहीची सार्वजनिक ठेव आहे. तिच्यावर संशय निर्माण झाला तर केवळ आयोगावर नाही, तर संपूर्ण निवडणूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहते.आणि म्हणूनच आता चौकशीपेक्षा आधी पारदर्शकता, स्पष्टीकरणापेक्षा आधी सत्य आणि दडपशाहीपेक्षा आधी संवाद हवा. अन्यथा आज विचारला जाणारा 'एवढे भय कशामुळे?' हा प्रश्न उद्या लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न बनेल!

# आई-वडील व शिक्षक विद्यार्थ्यांचे हितचिंतक असतात

आई-वडील व शिक्षक हे मुलांचे हितचिंतक असतात. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण तेच त्यांच्या सानिध्यात असलेल्या मुलांचे भविष्य बनवीत असतात. त्यांना वर नेण्यासाठी प्रयत्न करीत असतात. परंतु विद्यार्थी त्यांना आपले हितचिंतक समजत नाहीत व त्यांनाच तोंडावर तोंड देत असतात. त्यांचाच पदोपदी अपमान करीत असतात. हेच वास्तव चित्र आहे आजचं. ज्यातून मुलं ही बलदंड तयार होत नाहीत. ती शारिरीक मानसिक बौद्धिक व इतर प्रकारच्या विकासापासून वंचीत राहतात. जो विकास शिक्षक व आई-वडील करु शकतात. यात शंका नाही.



आजच्या काळातील काही विद्यार्थी हे मेधावी छात्र बनत आहेत तर काही विद्यार्थी हे जास्त शिकत आहेत. परंतु ते मेधावी छात्र बनत नाहीत. तसं पाहिल्यास आजच्या काळात सर्वच विद्यार्थी हे शिकू लागलेले आहेत. कारण त्यांना शिक्षणाचे महत्त्व माहित झालेले आहे.शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे. हे विद्यार्थ्यांना व त्याचबरोबर पालकांना चांगलं माहित आहे. त्यातच मोबाईल क्रांती झाल्यानं व स्मार्टफोन अस्तित्वात आल्यानं ज्या गोष्टी शाळेत शिकवल्या जात नाहीत. त्या गोष्टी सहजपणे मोबाईलच्या माध्यमातून मुलं शिकतात. उरलं सुरलं ज्ञान विद्यार्थी शिक्षकांच्या माध्यमातून शिकू लागलेले आहेत. परंतु हे जरी खरं असलं तरी पाहिजे त्या प्रमाणातील ज्ञान विद्यार्थ्यांना अवगत नाहीच. असं दिसून येत आहे. आजची मुलं शिकू लागलेली आहेत. ते उच्च शिक्षण घेवू लागलेले आहेत. परंतु सार्वकालिक व सर्वकालीन ज्ञान हे विद्यार्थ्यांना प्राप्त असलेलं दिसत नाही. आज बारावीच्या मुलांना साधं व्यवहारीक गणित विचारलं तर त्याचं उत्तर त्यांचेकडे नसतं. त्याचं कारण आहे, कृतीशील व व्यावहारीक शिकवणं. आज महागाईच्या फटक्याआड घरच्या लोकांनी कुटुंबनियोजन केलं असल्यानं ती मुलं लाडोबासारखीच वागतात. त्यांना जास्त रागावता येत नाही. रागवल्यास जीवाचं बरंवाईट करण्याची भीती निर्माण झालेली आहे. अर्थातच अगदी लहान लहान मुलं की ज्यांना स्वत:च्या 'स्व' पणाची जाणीवही आलेली नसते. अशी मुलं आज आत्महत्या करतांना दिसत आहेत. त्यातच मुलांमध्ये चिडखोर वृत्ती व चिडचिडपणा आलेला आहे. अलिकडील काळातील मुलं दहावी, बारावीसारख्या उच्चतम शिक्षा ग्रहण करतात. परंतु जसं व्यवहारीक गणित येत नाहीत. तसेच वाचनही येत नाही. त्याचं कारण आहे, त्यांना आईवडील, परीसर, नातेवाईक व शिक्षकांचे न रागावणे. मारणं तर दूरच राहिलं. मुलं समजविल्यानंही समजू शकत नाहीत. हा आजचा काळ आहे. आजची मुलं ही फक्त मोबाईलमध्ये व्यस्त असतात. मोबाईलमधील खेळ खेळण्यात व्यस्त असतात. त्यातच शालेय अभ्यास एवढा असतो की मुलं त्यामध्येही व्यस्त असतातच.

पुर्वी असं नव्हतं. रुग्णालये जास्त नसल्यानं, आजाराला बळी पडू नये म्हणून मुलं जास्त जन्माला घालण्याची पद्धती होती. कारण साथीचे रोग यायचे व साथीच्या रोगात अख्खी मुलं पक्षांसारखी मरुन जायची. कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया माहित नसल्यानं घरात कुटूंबनियोजन पद्धतीच नव्हती. मुलं देवाघरची फुलं आहेत. या अंधश्रद्धात्मक धोरणानंही मुलं जास्त जन्माला येत असत. त्यातच मुलांचं कुटूंबनियोजन म्हणजे पाप समजलं जायचं. मुलं जन्माला टाकणं हे देवाचं काम असून आपण त्यावर कुटूंबनियोजन शस्त्रक्रिया करणं म्हणजे देवाच्या कामात अडथळा आणणं. असंच समजल्या जात असे. ही मुले शिक्षणापासून वंचीत असायची. कारण शिक्षणासाठी औपचारिक प्रमाणाचे महत्व व सोय पाहिजे त्या प्रमाणात अस्तित्वात नव्हतीच. त्यातच मुलं जास्त असायची. मुलं शाळेत जायची नाहीत. तरीही त्यांना व्यवहार ज्ञान भरपूर असायचं. त्याचं कारण होते बालपणातील खेळ. बालपणात अशी मुलं खेळ खेळायची, विटीदांडू, कँचे, बिल्ले, सब्बल खुपसणे, कधी कब्बडी, लंगडी खो खो. कधी कार्यक्रम प्रसंगी घाणमाकड. आज घाणमाकड हा खेळच दिसत नाही व आजच्या मुलांनी घाणमाकड शब्द ऐकला की त्यांना आश्चर्य वाटतं. कितीतरी मुलं डाफ नावाचा खेळ खेळायचे. या खेळातून अशी मुलं जे कौशल्य शिकत. त्या कौशल्यातून त्यांचा शारिरीक व मानसिक विकास होत असे. एवढंच नाही तर त्यांचा बौद्धिकही विकास होत असे. आज मात्र तसं नाही. शिवाय बरीचशी मुलं आपल्या आईवडीलांसोबत किंवा स्वतंत्र कामाला जायची. ज्यातून ज्यातून जी मजूरी मिळायची. ती घेत असतांना आकडेमोड असायची. ती पटकन करता यायची. शिवाय काही मुलं लहानपणापासूनच गुरं ढोरं चारायची. ज्यातून आकडेमोड सतत बोटावर व्हायची.

अंकुश शिंगाडे
नागपूर

काही मुलं ही शाळेत जायची. अशी शाळेत जाणारी मुलं ही भरपूर हुशार असायची. त्याचं कारण होतं, त्याला शिक्षकांचं राखावणं. एखादं गणित शिकवून झाल्यावर त्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष न दिल्यास व ते गणित येत नसल्यास शिक्षक मार द्यायचे. ज्यातून मुलं ही धाकानं का होईना, शिकायचीच. अन शिक्षकांच्या धाकानं मुलं शाळेत न गेल्यास व घरी तक्रार आल्यास वडीलही झोडपायचे. कारण जास्त मुलं असल्यानं घरादारात लाड नव्हताच. ज्यातून अगदी पहिल्या दुसऱ्याच वर्गातील मुलांना आजच्या दहावीचं गणित यायचं. कारण धाकाच्यानं का असेना, मुलं अभ्यास करायचीच. आज मात्र तसं नाही. आजच्या मुलांना शिक्षकांचा धाक राहिलाच नाही. आई-वडीलांचाही धाक अजीबात दिसत नाही. मुलं शिक्षकांच्या तोंडाला तोंड देतात. तेच वागणं घरीही असतं. मुलं घरीही आई-वडीलांच्या तोंडाला तोंड देतात. घरी तास न तास सतत ते मोबाईलवर असतात. गावठी खेळ अजीबात बंद झालेले आहेत. विटीदांडू, चक्कर बिल्ला, सब्बलखुपसणं, टायर चालवणं, कँचे यासारखे गावठी खेळ आजच्या काळात दिसत नाहीत. डाफ नावाचा मुलांना अतिशय चौकस व हुशार बनविणारा खेळ मुलांना समजत नाही. खोखो, कबड्डीसारखे शरीराला बलदंड करणारे खेळ आज शाळेतूनही खेळवले जात नाहीत.

लहानपणापासूनच मोलमजुरीची कामं होत नाहीत. कुणीही आजच्या काळात गुरंढोरं चारायला नेत नाहीत. कारण गुरंढोरंच आज उरलेली नाहीत. मग कशी मुलं चौईस व बलदंड बनतील? आजच्या मुलांना पाच, ते दहा किलो वजनाचं साधं दप्तराचं ओझं पेलवत नाही. त्यांचे खांदे दुखतात. अन शाळेच्या पायऱ्या चढतांना इवल्या इवल्या मुलांचे हातपाय दुखतात. मुलं शिकतात. परंतु ती मनानं शिकत नाहीत. कसंतरी शिकायचं व शिकण्याची स्पर्धा आहे, म्हणून शिकतात. परंतु शारिरीक मानसिक बौद्धिक व इतर बऱ्याच प्रकारच्या विकासापासून मागं राहतात. ही शोकांतिकाच आहे. हे असं का घडलं? मुलं अशी का निपजत आहेत? आजची मुलं शिकतात. उच्चतम अर्हता प्राप्त करतात. परंतु वेगवेगळे आजार घेवून का फिरतात? अन कमजोर मनाची का होत आहेत? त्याचं कारण आहे, सरकारचं धोरण. सरकार कोणत्याही विद्यार्थ्यांना रागावण्याची परवानगी देत नाही. मारणं तर दुरंच, साधं रागावणं म्हणजे विद्यार्थ्यांचा अपमान वाटतो सरकारला. सरकार ज्याप्रमाणे शिक्षकांना रागविण्याची परवानगी देत नाहीत. तसेच ते आईवडीलांनाही रागविण्याची परवानगी देत नाहीत. ज्यातून मुलांवर रागवलं जात नसल्यानं ती तोंडाला तोंड देतात. कुणाचा मान करीत नाहीत. संस्कार दिसत नाहीत. ज्यातून देश बरबाद होण्याची एक भीषण दाहकता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिक्षक हे विद्यार्थ्यांचे मित्र आहेत. आईवडीलही आपल्या मुलांचे मित्र आहेत व हे दोन्ही घटक आपल्या मुलांशी सौजन्यानं वागतात व सौजन्यपूर्ण वागणूक ठेवतात. जी वागणूक मुलांना परीपक्व बनवू शकते. परंतु हे जरी खरं असलं तरी आजची मुलं ही परीपक्व असलेली दिसत नाहीत. याचंही कारण आहे सरकारचं धोरण. सरकारनं आपलं धोरण आजच्या काळात बदलविण्याची गरज आहे. पुर्वीच्याही धोरणांचा समावेश शिक्षणात करायला हवा. तरंच आजची पिढी शारिरीक दृष्टीनं व मानसिक दृष्टीकोनातून बलदंड होवू शकेल आणि देशालाही अशाच बलदंड तरुणांची गरज आहे. हे तेवढंच खरं. असे बलदंड तरुण तेव्हाच घडतील. जेव्हा विद्यार्थी शिक्षकांना आपले हितचिंतक मानतील व आपले समजतील तेव्हा. तसेच ते आपल्या आईवडीलांनाही स्वत:चे हितचिंतक समजतील तेव्हा. तोपर्यंत आजची पिढी पुर्वीसारखी सक्षम बनणार नाही.

# समाजिक प्रबोधन असणारा चित्रपट 'जयंती टू' हा प्रत्येकांनी पहावा!

दि.२ ऑक्टोबर रोजी नांदेड ई-स्केअर येथे जयंती टू ह्या सिनेमा च्या विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. शैलेश नरवाडे या दिग्दर्शकाने आरक्षण या विषयाचे महत्व अधोरेखित करून, प्रेक्षकांची नस ओळखून जयंती टू या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

आरक्षण विरोधी भूमिका तसेच आरक्षण हवे अशा द्वंदा चा हा विषय असलेला जयंती टू सिनेमा. समर्पक मांडणी करत हा चित्रपट पुढे जात असताना दोन्ही भूमिकेला तेवढेच महत्व देत देत शेवटी विद्यार्थी, शासन -प्रशासन व प्रेक्षकांनी ठरवावे आरक्षण जातीच्या आधारावर हवे का? सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून हवे? याचा सारासार विचार करून सामाजिक मंथन होणे, प्रबोधन होणे उथळ विचारांना थारा नसावा ही चित्रपट निर्मितीच्या मागची भूमिका असावी. पायल ही आदिवासी समाजातील एस.टी आरक्षणाच्या माध्यमातून बहात्तर टक्के मार्क मिळवून आपले स्वप्न उराशी बाळगून मोठ्या शहरातील महाविद्यालयात शिक्षणासाठी येते. ती दिसायला सुंदर नसली तरी बुद्धीने तलक ,हुशार व संशोधक वृत्तीची असणारी ही पायल, ग्रामीण भागातील अनेक समस्या अडी-अडचणी यावर मात करत. ओढा, नदी, नाले,जंगल ,जमीन निसर्गाच्या कुशीत वाढलेली स्वच्छंदी. आपल्या नव कल्पना चे स्वप्न उराशी बाळगून उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरात आली असता या महाविद्यालयात तिला जातीयतेच्या व दिसण्याच्या स्वरूपावरून शहरी विद्यार्थिनींच्या




रॅगिंगला सामोरे जात असताना, प्रतिकार करण्याचा प्रयत्न करते. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची तक्रार वर्ग शिक्षकाकडे करते. तेव्हा ते शिक्षक शहरी विद्यार्थिनींची बाजू घेऊन पायल हिस दोषी ठरवतो, खोटे बोलतो. त्या मुलीही साळु-सूद पणे तिच्यावर प्रथम तिनेच मारहाण केली असा खोटा आरोप करतात व प्रशासन ही तिलाच दोषी ठरवून तिच्यावर अन्याय केला जातो. तिला सस्पेंड केल्या जाते. सभोवतालच्या दांभिक पणाला ती बळी पडते आणि ती आपल्या गावी निघून जाते. तिच्या या प्रकरणावरून विद्यार्थ्यांत दोन गट पडतात. आरक्षण विरोधक व आरक्षण समर्थक अशा दोन गटात हा सिनेमा पुढे जातो.कारण सामाजिक सद्य परिस्थितीत आरक्षणा बद्दल समाजात समज-गैरसमज, अज्ञान कसे ठासून भरलेले आहे. त्याची उकल कशी झाली पाहिजे. अहिंसक पणे चळवळ पुढे जात असताना क्रोधाला उबाळी येऊन हिंस्र पणे खून खराब होतो की काय, असे चित्त वेधक वाटणारे अनेक प्रसंग सिनेमात आहेत.

राज गोडबोले
नांदेड.

हा सिनेमा प्रबोधनात्मक असला तरी कुठेही बोर, कँटाळवाणा होत नाही. संगीत, संवाद, सुरेख चित्रन आणि कलावंतांनी केलेल्या भूमिका प्रेक्षकांना खिळवून ठेवतो, दिग्दर्शक शैलेश नरवाडे यांच्या डायरेक्शन खाली सर्वच बाबींनी हा सिनेमा कमालीचा यशस्वी झाला आहे.जयंती टू या सिनेमाच्या प्रोमो शो साठी या सिनेमाची टीम नांदेड येथील भारत ई-स्केअर सिनेमागृहात आली असता प्रा. राजेंद्र गोणारकर यांनी कलावंतांचा परिचय करून दिला. सिनेमात नायकाची भूमिका करणारे नायक सत्या (ऋतुराज वानखेडे) प्रताप या विलनची भूमिका करणारे (राजकुमार जरांगे) व डायरेक्टर शैलेश नरवाडे यांचा परिचय करून दिला. कलावंतांनी व डायरेक्टरने प्रेक्षकांशी संवाद साधून सिनेमा वरील प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. क्रांती राहुल प्रधान व त्यांच्या मित्र मंडळीनी या शोचे आयोजन केले होते.राहुल प्रधान यांनी जयंती टू या सिनेमाची प्रबोधनात्मक सामाजिक बांधिलकी चे महत्व विशद करून प्रेक्षकांना मोठ्या प्रमाणात हा सिनेमा पाहण्याचे आवाहन केले. याप्रसंगी थोर साहित्यिक विचारवंत नाटककार प्रा.दत्ता भगतसर, डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, पत्रकार ,सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे अनेक लोक तसेच मोठा प्रेक्षक वर्ग उपस्थित होता.

# व्हीजेएनटी प्रवर्गासाठी एकदिवसीय सेवा शिबिराला लाभार्थ्यांचा प्रतिसाद

उमरखेड/प्रतिनिधी- महसूल विभागाच्या सेवा संकल्प अभियाना अंतर्गत विमुक्त, भटक्या जाती व जमाती प्रवर्गातील नागरिकांसाठी विठ्ठल येथील ग्रामपंचायत कार्यालयात एकदिवसीय सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी यशस्वीरित्या पार पडले. महसूल विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद देत या शिबिरात बहुसंख्य लाभार्थ्यांनी सहभाग घेऊन शिबिर मोठ्या प्रमाणात यशस्वी केले.

शिबिरात नागरिकांना विविध शासकीय सेवा व दाखले एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आले. त्यामध्ये आधार अपडेट, महिला शेतकरी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, फार्मर आयडी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, अधिवास प्रमाणपत्र, आयुष्मान कार्ड, ज्येष्ठ नागरिक दाखला, विवाह नोंद प्रमाणपत्र, बेबी केअर किट वाटप यासह इतर अनेक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. उमरखेड महसूल विभागाच्या वतीने तहसीलदार सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल मंडळ अधिकारी प्रियंका क्षीरसागर यांनी या सेवा शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.यावेळी अप्पर तहसीलदार रोहित शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख, प्रल्हाद मस्के, गणेश गांजेगावकर, पोलीस पाटील गजानन मुलंगे, तलाठी जयस्वाल, गरुडे, कोलेवाड, सातदिवे, साखरवाड मॅडम, कल्याणकर मॅडम, ग्रामसेवक कोंडावार, कृषी सहाय्यक बिरमवार, कांबळे ताई, शीला ताई धुळे, महसूल सेवक प्रल्हाद गजभार, आकांक्षा धुळे, पूजा ढोले, पट्टाचरा दिवेकर, साई हिंगे, शिवकांत मोरे, ग्रा.पं. लिपिक अंकुश लामटिळे, गजानन झरकर आदी उपस्थित होते. व्हीजेएनटी प्रवर्गातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ थेट त्यांच्या गावात मिळावा, हाच या सेवा संकल्प अभियानाचा मुख्य उद्देश असून विठ्ठलकरांनी दिलेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. अधिकारी प्रियंका क्षीरसागर अशी प्रतिक्रिया मंडळ यांनी व्यक्त केली.



सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,प्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, प्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सिमेंट कॉंक्रिटच्या नवीन कामांवर बंदी;पाणी गळती दुरुस्तीसाठी ८ दिवसांची मुदत

## मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांचे आढावा बैठकीत निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-अल-निनोच्या प्रभावामुळे शासनाने राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर, आगामी पाणी टंचाई लक्षात घेता शहरात सुरु असलेले सिमेंट कॉंक्रेटचे रस्ते दहा दिवसात पूर्ण करावेत. नवीन कामांना मंजुरी दिली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांनी पालिका मुख्यालयात पाणी पुरवठा विभागाच्या आढावा बैठकीत दिले आहेत.

या बैठकित आयुक्तांनी दुष्काळ परिस्थितीचा सामना करण्यासाठी आणि शहरातील नागरिकांना पुढील उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी पाणी पुरवठा विभागाला अत्यंत काटेकोर नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून सर्व अभियंत्यांनी वैयक्तिक जबाबदारी घेऊन ही कार्ये पार पाडावीत असे बजावले आहे. तसेच शहरातील उपलब्ध जलसाठा आणि दैनंदिन पाणी वापराचा पाणी पुरवठा विभागाकडून नियमित आढावा घेतला जाईल. यासोबतच पाणी टंचाईवर मात करण्यासाठी महानगरपालिकेतर्फे व्यापक स्तरावर जनजागृती मोहीम राबवून नागरिकांना पाणी काटकसरीने वापरण्यासाठी आवाहन केले जाईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.बैठकीत प्रामुख्याने शासनाच्या



निर्देशानुसार महानगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे अनिवार्य आहे. यासाठी आगामी १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणी वापरामध्ये किमान १० टक्के कपात करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांनी पुढील ७ दिवसांत पाणी बचतीचे सविस्तर नियोजन सादर करावे असे निर्देश यावेळी मनपा आयुक्तांनी दिले आहेत. त्याचप्रमाणे बांधकाम क्षेत्रातील पाण्याचा मोठा वापर पाहता, शहरातील सुरू असलेली सिमेंट कॉंक्रिटची विकास कामे पुढील १० दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतर शहरातील कोणत्याही नवीन सिमेंट कॉंक्रिटच्या कामांना परवानगी देण्यात येणार नाही. पाण्याचा एकही थेंब वाया जाऊ नये यासाठी पुढील ८ दिवसांत संपूर्ण शहरातील पाणी पुरवठा गळती दुरुस्तीची कामे पूर्ण करावीत असे कडक निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

मुख्य जलवाहिन्या तसेच अंतर्गत जलवाहिन्यांवरील गळती तातडीने थांबवून त्याचा अहवाल सादर करावा तसेच जलाशयावरील पंपिंग पूर्ण क्षमतेने व योग्य रितीने चालवणे तसेच जलशुद्धीकरण केंद्रावरील पाणी आवर्तनावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पाणी वापराचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला असून पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. भविष्यातील गंभीर टंचाईचा सामना करण्यासाठी एकूण उपलब्ध जलसाठ्यापैकी किमान १० टक्के अतिरिक्त पाणी साठा आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात येईल. परिस्थिती आणखी बिकट झाल्यास आवश्यकता लक्षात घेऊन धरणातील मृतसाठ्यातील पाण्याचा वापर कसा करता येईल, याचे तांत्रिक नियोजन आत्तापासूनच करण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच पाणी टंचाईच्या अनुषंगाने भविष्यात शहरात जी कामे हाती घ्यावयाची आहेत, त्यांचाही आराखडा आत्तापासूनच विचारात घ्यावा, असे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले.या बैठकीला शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, क्रिडा व सांस्कृतिक अधिकारी रमेश चवरे, उपअभियंता प्रकाश कांबळे, खुशाल कदम, नरेंद्र सुजलेगांवकर, शिवकन्या जायेभाये, कनिष्ठ अभियंता शेख जैनौद्दीन, उत्तम स्वामी, राजकुमार बोडके, जक्कीउल्ला खॉंन, किरण सुर्यवंशी, व्यंकटेश गोकुळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे आदी उपस्थित होते.

# जलतारा अंतर्गत जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

माहूर/प्रतिनिधी-पावसाने पाठ फिरवल्याने माहूर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची दाहकता मंगळवारी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रत्यक्ष पाहणीत समोर आली. पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलतारा अंतर्गत मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे हाती घेऊन योजना प्रभावीपणे राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, सहाय्यक जिल्हाधिकारी बी सरवण तहसीलदार अभिजित जगताप यांची उपस्थिती होती.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, यांनी लखमापूर ग्रामपंचायतीला भेट देऊन जलतारा अंतर्गत कामाचे उद्घाटन केले. माहूर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक गावांमध्ये पाण्याची उपलब्धता घटली असून, शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे दुष्काळावर मात करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहेत. उपलब्ध साधनसामग्री आणि मनुष्यबळाचा प्रभावी वापर करून अधिकाधिक कामे पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे नेते समाधान जाधव यांनी अधिकाऱ्यांसमोर तालुक्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती मांडली. पावसाअभावी शेतीचे झालेले नुकसान, घटलेली पाणीपातळी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर राबवावीत तसेच भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी ठोस नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केली.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी थेट गावपातळीवर भेट देऊन परिस्थितीची पाहणी केल्याने माहूर तालुक्यातील जलसंधारणाच्या कामांना आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# माजी आ.अमिता चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त श्रावण पाटील भिलवंडे यांच्याकडून अभिष्टचिंतन

नायगाव/प्रतिनिधी-माजी आ.सौ. अमिता चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्त मुंबई येथे नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी सौ. अमिता चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धी लाभो, अशा शुभेच्छा श्रावण पाटील भिलवंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.



# एक्सपायरीचा माल विक्रीस ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड शहरात मुदतबाह्य बिस्कीट, खाद्यतेल, केक, चिप्स तसेच लहान मुलांच्या खाद्यपदार्थांची विक्री केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नागरिकांच्या, विशेषतः लहान मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधित दुकानांची तातडीने तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम समितीचे अध्यक्ष एस. के. बबलू यांनी बुधवारी मुखेड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन मुदतबाह्य खाद्य पदार्थांच्या विक्रीला आळा घालण्याची मागणी केली. शहरातील विविध दुकानांची तपासणी करून मुदतबाह्य खाद्यपदार्थ आढळून आल्यास संबंधित विक्रेत्यांवर नियमानुसार कारवाई करावी, तसेच आवश्यक असल्यास दुकानांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मुदतबाह्य खाद्यपदार्थांची विक्री होत असल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता शहरातील खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची प्रत्यक्ष तपासणी करून मुदतबाह्य माल जप्त करावा आणि संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीच्या वतीने करण्यात आली आहे.यावेळी सदाशिव चौहान, महादेव देवकते, रौफ मुल्ला, अनिल दंडलवाड, खदिर शेख, गौस पठाण, इरफान आदी उपस्थित होते.

# मुदखेड परिसरात बिबट्याचा संचार



नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यातील पार्डी वैजापूर, निवघा, राजवाडी, पिंपळकौठा मगरे व परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

बिबट्या शेतात बांधलेल्या जनावरांवर हल्ले करीत असून जनावरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदरील बिबट्यास जेरबंद करण्यास वन विभागाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. पिंपळकौठा येथील शेतकरी नारायण अंजनवाड यांच्या शेतात बांधुन ठेवलेल्या म्हशीच्या पिल्यावर बिबट्याने हल्ला करुन जखमी केले आहे. दररोज हा बिबट्या परिसरातील नागरिकांना कुठे ना कुठे दिसून येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. बिबट्याच्या दहशतीमुळे शेतकरी शेतात जाण्यासाठी घाबरत आहेत. वन विभागाने त्वरीत या बिबट्यास जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी व सीईओंची लखमापूर शाळेला अचानक भेट



माहूर/प्रतिनिधी-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लखमापूर तांडा येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी अचानक भेट देऊन शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांची उपस्थिती, स्वच्छता तसेच विविध भौतिक सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती घेतली.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संवाद साधत विविध प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने दिलेली उत्तरे ऐकून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उपस्थित अधिकाऱ्यांनीही टाळ्या वाजवून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता, शिक्षकांची उपस्थिती, शालेय परिसरातील स्वच्छता आणि उपलब्ध भौतिक सुविधांची पाहणी केल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व सीईओ महेश पाटील यांनी शाळेच्या एकूण व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी तहसीलदार अभिजित जगताप, ज्ञानेश्वर टाकरस, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार तसेच लखमापूर तांडा ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश राठोड उपस्थित होते.

पुढील तारीख - १९/११/२०२६

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर,यांचे न्यायालयात
हिमायतनगर जि.नांदेड
किरकोळ अर्ज क्र.आर.जे.ई.१२१/२०२६

अर्जदार - १) सीमा भ्र.सखाराम डाके, वय-४० वर्षे, धंदा-मजुरी, २) गुंजन पि.सखाराम डाके, वय-१९ वर्षे, धंदा-शिक्षण, ३) मंजूषा पि.सखाराम डाके, वय-१७ वर्षे, धंदा-शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र.१, ४) गणेश पि.सखाराम डाके, वय-१३ वर्षे, धंदा-शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ सर्व रा.परमेश्वर गल्ली, हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार - निरंक

मुंबई विनीमय कायदा १८२७ नुसार मयत नामे सखाराम पि. नारायण डाके ह्यांच्या मृत्युपश्चात अर्जदारास कायदेशिर वारसा उत्तराधिकारी प्रमाणपत्र जारी करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, सखाराम पि.नारायण डाके, यांचा मृत्यु दिनांक ०९/०२/२०२१ रोजी त्यांच्या राहत्या घरी परमेश्वर गल्ली, हिमायतनगर येथे मयत झाले आहेत. सखाराम पि.नारायण डाके हे रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड येथील रहिवाशी होते. मयतांच्या पश्चात अर्जदार हे सध्या वरील ठिकाणचे रहिवासी आहे. त्यांनी कायदेशीर वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार ह्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहुन अथवा त्यांचे विधीज्ञ मार्फत ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही काही आक्षेप/उजर नाही असे समजून प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने देण्यात आले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
हिमायतनगर

स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
हिमायतनगर

## जाहीर प्रगटन

अर्धापुर येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,अर्धापुर यांच्या न्यायालयात
समक्ष आर.बि.सोरकर दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,अर्धापुर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८९/२०२६
सखाराम वि.निरंक

अर्जदार - १.सखाराम पि.रामजी सावते, वय : ७६ वर्षे, धंदा : मजुरी रा.येळेगाव ता.अर्धापूर जि.नांदेड, २. प्रभु पि.सखाराम सावते, वय : ४५ वर्षे, धंदा : मजुरी, रा.नंदादीप कॉलनी, नढे नगर, साहिल निवास जवळ, पिंपरी पुणे

वि.

गैरअर्जदार - निरंक

दावा :- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७, कलम २ व ३ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत दिलीप सखाराम सावते यांचा अर्जदार क्र.१ हे मयताचे वडील, अर्जदार क्र.२ हा भाउ आहे. मयत दिलीप सखाराम सावते यांचा मृत्यू दिनांक २७.०३.२०१३ रोजी झाला. रा.येळेगाव ता.अर्धापूर जि.नांदेड.

अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०१/१०/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी नोंदवावा, मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
अर्धापूर

स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
अर्धापूर

# बिलोली तालुका मन्नेरवारलू समाज संघटनेच्या अध्यक्षपदी सायरेड्डी ठक्कूरवार

कुंडलवाडी/प्रतिनिधी-के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडीचे अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार यांची बिलोली तालुका मन्नेरवारलू समाज संघटनेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. समाज बांधवांच्या बैठकीत त्यांच्या नावाची एकमताने घोषणा करण्यात आली.



या निवड कार्यक्रमास मन्नेरवारलू समाज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड, जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते सुरेशराव अंबुलगेकर, माजी जि.प.अध्यक्ष सौ. मंगाराणी अंबुलगेकर, नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील विविध मान्यवर आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायरेड्डी ठक्कूरवार यांच्या निवडीमुळे बिलोली तालुक्यातील मन्नेरवारलू समाजाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळ मिळेल. समाजाच्या विविध प्रश्नांना व सामाजिक उपक्रमांना प्रभावीपणे चालना मिळण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाचा फायदा होईल, अशी भावना उपस्थित समाज बांधवांनी व्यक्त केली.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समाजाच्या विकासासाठी तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून संघटन मजबूत करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन उपस्थितांनी केले. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार, गजानन कोटलावार, सुरेश दुगमोड, वसंत स्वामी, हनमंलू गोणेलवार, सायरेड्डी पुप्पलवार, संजय गोणेलवार, गंगय्या ठक्कूरवार, शंकर शिवाजी कोंडावार, बंटी ठक्कूरवार, लक्ष्मण बोधनकर, सायन्ना पोरडवार, गंगाधर गड्डूवार, नरसीमलू ठक्कूरवार, पेंटाजी ठक्कूरवार, कृष्णा जायेवार, पोशेट्टी कोशकेवार यांच्यासह समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्काळात वीज संकटाची भर;वानोळा परिसर अंधारात!

## पाच गावांचा वीजपुरवठा अनेक दिवसांपासून बंद;आ.हेमंत पाटलांचे कार्यकारी अभियंत्यांना पत्र

किनवट/प्रतिनिधी-विज वितरण कंपनीच्या वानोळा सबस्टेशन अंतर्गतच्या दहेगाव, मोहपूर, दिगडी, धानोरा, साकूरसह परिसरातील विद्यूत पुरवठा विद्यूत वाहिन्या, ट्रॅाँसफार्मर, फिडर, पोल अशा विविध तांत्रिक अडचणींमुळे बंद झालाय. सार्वजनिक पाणी पुरवठा असेल, कृषी पंप आणि लघू उद्योगांसह अत्यावश्यक सेवा प्रभावित झाल्या आहेत. यावर्षी तर भिषण दुष्काळाचे सावट आहे. विज ग्राहकांची परवड थांबवून शक्य तेवढ्या लवकर विद्यूत पुरवठा सुरळीत करण्यासाठी अध्यक्ष स्व.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र व आ. हेमंत पाटील यांनी भोकरचे कार्यकारी अभियंत्यांना ५ ऑक्टोबर रोजी उद्देशून पत्र दिले आहे.

किनवट आणि माहूर तालुक्यातील विज वितरण कंपनीच्या विद्युत पुरवठ्याचे ग्रामीण भागातील विदारक चित्र आहे. विज वाहक तारा लोंबकळत्या राहाणे, तुटणे. पोल वाकणे, मोडून पडणे. रोहित्र नादुरुस्त होणे अशा तांत्रिक अडचणींचा कायमचा बंदोबस्त करावा लागणार आहे. ग्रामीण भागातील समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. याकडे स्थानिक प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होतांना दिसते. लोकांच्या रेट्यामुळे स्थानिक प्रशासनाने जरी धडपड केली तरी भोकर प्रशासनाच्या अडेलतट्टू धोरणांमुळे वेळेत कामे केली जात नाहीत. मलिदा दिल्याशिवाय कामे होत नसल्याच्या तक्रारी ऐकायला मिळताहेत. म्हणून लोकांनी हेमंत पाटील यांच्याकडे धाव घेतल्याचे सांगण्यात आले. वानोळा सबस्टेशन अंतर्गतच्या दहेगाव, मोहपूर, दिगडी, धानोरा, साकूरसह परिसरातील विद्यूत पुरवठा विद्यूत वाहिन्या, ट्रॅाँसफार्मर, फिडर, पोल अशा विविध तांत्रिक अडचणींमुळे अनेक दिवसांपासून बंदच पडले आहेत. त्यामुळे सार्वजनिक पाणी पुरवठा, कृषी पंपांना, लघू उद्योगांसह अत्यावश्यक सेवा प्रभावित झाल्या आहेत. यावर्षी तर भिषण दुष्काळाचे सावट आहे. नदी-नाले कोरडी ठाक पडलीत. गुराढोरांच्या आणि जंगली प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. म्हणून विज ग्राहकांची परवड थांबवून शक्य तेवढ्या लवकर विद्यूत पुरवठा सुरळीत करण्यासाठी आ. हेमंत पाटील यांनी भोकरचे कार्यकारी अभियंत्यांना ५ ऑक्टोबर रोजी उद्देशून पत्र दिले आहे. विज ग्राहकांना अशा कामांसाठी आमदार, माजी खासदारांकडे धाव घ्यावी लागते तेंव्हाच ती कामे केली जातात हे विशेष म्हणता येईल.

# गुंडवळच्या उपसरपंचांविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

## राहुल कांबळे पदावरुन पायउतार

माहूर/प्रतिनिधी-मौजे गुंडवळ, ता. माहूर येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच राहुल सतपाल कांबळे यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला अविश्वास ठराव मंगळवारी (६) विशेष सभेत ६ विरुद्ध २ मतांनी मंजूर झाला. तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी अभिजित जगताप यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत हात उंचावून मतदान घेण्यात आले.

उपसरपंच राहुल कांबळे हे ग्रामपंचायतीत मनमानी कारभार करीत असून, सदस्यांना विश्वासात घेत नाहीत, तसेच सरपंचांच्या निर्णय प्रक्रियेत अडथळे निर्माण करतात, असा आरोप अविश्वास प्रस्ताव दाखल करणाऱ्या सदस्यांनी केला होता. ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांसह विकासकामांमध्ये हस्तक्षेप करून पदाचा गैरवापर केल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले होते.या आरोपांच्या आधारे ग्रामपंचायतीच्या सहा सदस्यांनी ३० सप्टेंबर रोजी तहसीलदार अभिजित जगताप यांच्याकडे अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यासाठी अर्ज सादर केला होता. त्यानुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३५ (१) अन्वये मंगळवारी सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, गुंडवळ येथे विशेष सभा घेण्यात आली. सभेत अविश्वास प्रस्तावावर हात उंचावून मतदान घेण्यात आले. यावेळी प्रस्तावाच्या बाजूने सहा, तर विरोधात दोन सदस्यांनी मतदान केले. त्यामुळे ६ विरुद्ध २ मतांनी उपसरपंच राहुल सतपाल कांबळे यांच्याविरुद्धचा अविश्वास ठराव मंजूर झाला. यावेळी तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी अभिजित जगताप, मंडळ अधिकारी व्ही. के. पाईकराव व तलाठी यादव उपस्थित होते.

# तिरुपतीहून परतणाऱ्या देगलूरच्या भाविकांच्या स्कार्पिओला अपघात एक ठार

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथून तिरुपतीच्या दर्शनासाठी गेलेले पाच मित्र स्कार्पिओ गाडीने परत देगलूर ला येत असताना त्यांच्या वाहनाचे पाठीमागील टायर फुटल्याने झालेल्या या अपघातात येथील एका जणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवार ६ ऑक्टोंबर रोजी आंध्र प्रदेशातील कडप्पा पहरानजीक पिल्लोरु या गावाजवळ घडली.

देगलूर येथील बालाजी कृषी दुकान चालकाचे मालक व्यंकटेश रायेवार वय (४६) यांनी त्यांच्या मालकीच्या गाडीने देगलूर महाविद्यालयातील प्रा. संतोष येरावार, गणेश कोडगिरे, रुपेश एलबोई (मुक्रमाबाद), विठोबा बोधनकर, व्यंकट रायेवार हे पाच मित्र तिरुपतीच्या दर्शनासाठी गेल्या चार दिवसांपूर्वी देगलूरहुन गेले होते. दर्शन करून परत येत असताना त्यांच्या वाहनाचे पाठीमागील टायर फुटल्याने गाडी तीन वेळेस रस्त्यावर पलटी झाली. या अपघातात व्यंकटेश येरावार यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना मंगळवार दि.६ ऑक्टोबर रोजी आंध्रप्रदेशातील एका गावाजवळ घडली. ही वार्ता देगलूर येथे कळताच काही मित्र व नातेवाईकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. मृत व्यंकटेश यांच्या मुलीचा मंगळवारी वाढदिवस असल्याने ते देगलूर येथे येऊन वाढदिवस साजरा करण्याच्या वेतात असतानाच त्यांच्यावर काळाचा घाला झाल्याने सर्वत्र हळूहळू व्यक्त केली जात आहे. व्यंकटेश रायेवार यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार असून अपघाताची बातमी कळताच येथील मोंढा परिसरातील व्यवसायिकांनी आपली प्रतिष्ठान बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण केली.

# घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीला एलसीबीने केली अटक



नांदेड/प्रतिनिधी-घरफोडी व चोरीच्या घटनेतील एका आरोपीला स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी शहरातील नुरी चौक भागातून सोमवारी अटक केली. त्याच्या जवळून १ लाख २८ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे.

घरफोडी व चोरीच्या घटनेतील एक संशयीत आरोपी नुरी चौक भागात फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार नागनाथ तुकडे, सहायक फौजदार दारासिंग राठोड व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी सायंकाळी नुरी चौक भागात सापळा रचुन सय्यद शारेख सय्यद शाहजेब (वय १९) रा. रहेमतनगर, देगलूर नाका,नांदेड यास अटक केली. पोलीसांनी त्याची कसुन चौकशी केली असता त्याचा साथीदार शेख सलमान शेख मद्दीदादा (वय २२) रा. खडकपूरा, नांदेड याच्यासोबत नांदेड विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हरीओमनगर येथे एका घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेली होती. तसेच दुसरा साथीदार शेख अरबाज रा. मिल्लतनगर,नांदेड याच्यासोबत मिळून हडको भागात एका घरामध्ये चोरी केली होती. पोलीसांनी आरोपीकडून चोरीच्या घटनेतील १ लाख २८ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

**नांदेड**-शहरातील तानाजीनगर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत होण्याचा प्रकार वाढला आहे. दिवस-रात्र असा अधुन-मधून वीज पुरवठा खंडीत होण्याचा दिनक्रम सध्या सुरु असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वेळेवर विद्युत बील भरुनही अशा प्रकारे महावितरणकडून नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न सुरु असल्याने या भागातील नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

### भारतीय महिला...

करत असल्याचे म्हटले आहे. दरम्यान, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या वर्षी पहिल्यांदाच महिला वनडे विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले होते. आता स्मृतीसमोर हा यशस्वी वारसा पुढे नेण्याचे मोठे आव्हान असणार आहे.


## जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,मुदखेड यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१७५/२०२६
यशोदाबाई गव्हाणे व इ.विरुद्ध निरंक

१. यशोदाबाई भ्र.गुलाबराव गव्हाणे, वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी, २. दिनेश पि.गुलाबराव गव्हाणे, वय : ३२ वर्षे, धंदा : शेती, ३. सरस्वतीबाई भ्र.भिमराव गव्हाणे, वय : ७६ वर्षे, धंदा : गृहिणी अर्जदार क्र.१ ते ३ रा.नागेली ता.मुदखेड जि.नांदेड, ४. दिपाली भ्र.सचिन चिंचोलीकर, वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी दिपाली पि. गुलाबराव गव्हाणे रा.१४३, जि.प.शाळेजवळ, शिवाजी चौक चिंचोली पो.बाचोटी ता.कंधार जि.नांदेड.

...अर्जदार

विरुद्ध

...गैरअर्जदार

निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी या न्यायालयात मयत गुलाबराव पि.भिमराव गव्हाणे यांचे वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. गुलाबराव पि. भिमराव गव्हाणे यांचे दिनांक २७/०१/२०२४ रोजी नागेली ता.मुदखेड जि.नांदेड येथे निधन झाले आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ मुलगा, अर्जदार क्र.३ मयताची आई, आणि अर्जदार क्र.४ ही मयताची मुलगी आहे. अशाप्रकारे अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत यांना ईतर वारस नाही.

मयत गुलाबराव पि.भिमराव गव्हाणे यांच्या मृत्युनंतर अर्जदारास विविध शासकिय व निमशासकिय कार्यालयामध्ये तसेच घरकुल योजनेकरीता वारस प्रमाणपत्राची गरज भासत असून तेथील अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जदारांना सन्माननीय न्यायालयातून मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणण्याची तोंडी सूचना केली आहे.

करिता याद्वारे सर्व जनतेस व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीन दिवसांच्या आत दाखल करावा स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून आपला आक्षेप दाखल करावा. दिलेल्या तारखेस हजर राहणेस व आक्षेप दाखल करण्यास कसुर केल्यास अर्जाची एकतर्फी चौकशी होउन पुढील आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **क.लिपीक** दि.न्या.क.स्तर,मुदखेड

स्वाक्षरित/- **(सहा.अधिक्षक)** दिवाणी न्यायालय क.स्तर,मुदखेड


# उमरी बाजारचे सरपंचपद रिक्त,पोटनिवडणूक रखडली

## किनवट पंचायत समितीचा अनागोंदी कारभार चर्चेत

किनवट/प्रतिनिधी-किनवट पंचायत समितीच्या अनागोंदी कारभारामुळे उमरीबाजार ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची पोट निवडणूक गुंडाळून ठेवली. आदिवासी महिला सरपंचांनी कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना अनर्ह ठरविल्यापासून सरपंचपदाची जागा रिक्तच आहे. ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी ८ मे २०२५ रोजी तसा अहवाल गटविकास अधिकाऱ्यांकडे सोपवला खरा पण पंचायत समितीने तहसीलदारांकडे अद्यापही अहवाल पाठविला नसल्याने माजी सरपंच अरुण मडावी यांच्या नेतृत्वाखाली २८ सप्टेंबर रोजी पोट निवडणूक घेण्यासंबंधाने पत्रव्यवहार केलाय.

आदिवासी महिला सरपंचांवर अविश्वास आणून अनर्ह ठरल्यानंतर सरपंचांची जागा रिक्त ठेवून उपसरपंच गावगाड्याचा कारभार सांभाळतात. पोट निवडणूक होऊच नये यासाठीची पंचायत समिती प्रशासनाला मुठीत ठेवून तजबिज केली जाते हा बोलका इतिहास आहे. जो पर्यंत पंचायत समिती तहसील प्रशासनाकडे पोट निवडणूक घेण्यासंबंधाने अहवाल सोपवणार नाही तोपर्यंत ती जागा रिक्तच ठेवली जाते. हा खेळ एकट्या उमरीबाजार पुरता मर्यादित नाही तर अशा अनेक घटना आहेत. खरे तर पंचायत समितीतील अशा अधिकाऱ्यांची चौकशी होऊन कारवाई व्हायला पाहिजे. किनवट पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील उमरीबाजार ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अरुण मडावी यांच्या नेतृत्वाखाली संजय मुरलीधर जुगनाके, प्रभाकर हनमंतु परचाके, दत्ता सिताराम कनाके, कौशल्याबाई सुखदेव मेश्राम, सुभाष जंगा सलाम, प्रभाकर सूर्यभान कोटनाक, दत्ता गंगाराम सिडाम, रमेशकुमार गेडाम यांच्या शिष्टमंडळाने सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांकडे पोट निवडणूक घेण्यासंबंधाने पत्रव्यवहार केल्याचे प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

# नांदेड शहरातील ९८ रोहित्र पेट्या दुरुस्तीनंतर दारबंद

नांदेड/प्रतिनिधी-महावितरणच्या नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता राजाराम माने यांच्या सुचनेनुसार आणि अधीक्षक अभियंता नांदेड संजय खंदारे यांच्या पुढाकारतून नांदेड शहर विभागाने शहरातील रहदारीच्या ठिकाणी असलेल्या विद्युत वितरण रोहित्रांखालील ९८ वितरणपेट्या दुरुस्ती कामानंतर दारबंद केल्याची माहिती नांदेड मंडल कार्यालयाने कळविली आहे.

शहरातील रहदारी आणि गर्दीच्या ठिकाणी असलेल्या सुमारे २५० विद्युत वितरण रोहित्र पेट्यांसंदर्भात नागरिकांच्या तक्रारी होत्या. त्याची दखल घेवून महावितरणच्या नांदेड शहर विभागाचे कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री यांनी वरिष्ठांच्या सुचनेनुसार विद्युत वितरण पेट्यांच्या दुरुस्तीची मोहिम हाती घेतली. मागील पंधरा दिवसांच्या कालावधीत २५० पैकी ९८ वितरण रोहित्र पेट्यांमधील किटकॅट, लंग्ज, फ्युजतारा आणि केबल बदलीनंतर त्या रोहित्र पेट्या दारबंद करण्यात आलेल्या आहेत.


जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/१३८२/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २९-९-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१५१८२/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या अधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की श्री. **पाराजी माधवराव घटकार, २. बालाजी माधवराव घटकार** रा.**तरोडा खु.,नांदेड** यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०.१०.२००९ तरोडा खु. गट नं.८७ पैकी प्लॉट क्रं.०४ पिन क्र. ४०१०३०७३४८६** श्री.**निरंजन शिवाजी कोल्हे** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.३२७९ दि.३०/०३/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- प्लॉट नं.०१ आहे, **पश्चिम-**२५ फुट रुंद रोड आहे, **दक्षिण-**प्लॉट नं.०३ आहे, **उत्तर-**प्लॉट नं.०५ आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड


पान १ वरुन

### ज्ञानेश हटावो,लोकशाही...

प्रा.यशपाल भिंगे, कॉ. गंगाधर गायकवाड, अनिल मोरे, राजेश पावडे, आनंदराव गुंडिले, बालाजी गाडे, कुमार कुर्तडीकर, नगरसेवक सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, मो. इब्राहिम, राजू गोडबोले, महेश देशमुख तरोडेकर, गणेश ढगे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, शेर अली, डॉ. बाकी, अर्जुन ठाकूर, संदिप देशमुख, सुरेश हटकर, दिपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, प्रवीण कानगुले, रमेश चित्ते, अब्दुल रहिम, संजय वाघमारे, गगन यादव, कॉ.उज्वला पडलवार, कॉ.मीना आरसे, तरुणुम पठाण, ललिता कुंभार, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, वेंकोबा येडे पाटील, गंगाधर सोंडारे, गणेश कोकाटे, जसपालसिंघ तबेलेवाले, संजय कौठेकर, प्रीतम जोंधळे, शेख कलिम, गोविंद पाटील, माजी नगरसेवक गणेश कुंटेवार, माधव भालेराव आदीसह इंडिया आघाडीतील सर्वच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते महामोर्च्यात मोठ्या संख्याने सहभागी झाले होते.

### एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना...

पारदर्शक आणि प्रामाणिकपणे पार पडणे आवश्यक आहे. परीक्षा प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांच्या मनात विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. पालक आपल्या मुलांना शिक्षणासाठी पुण्यात पाठवतात. त्यासाठी त्यांना मोठा आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. शासनाने कोणताही निर्णय घेताना तो पारदर्शक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास वाढविणारा असावा, अशी अपेक्षाही न्यायालयाने व्यक्त केली. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि शासनाने ते प्रश्न सोडविले पाहिजेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. आ.रोहित पवार यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थ्यांचे आंदोलन अद्याप सुरू असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एमपीएससी परीक्षेतील कथित गैरप्रकार, विद्यार्थ्यांच्या मागण्या आणि शासनाच्या भूमिकेकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्यास...

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत. शासकीय कामकाजात दिरंगाई अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### महाज्योतीच्या स्कॉलरशिप...

महाज्योती प्रशासनावर निशाणा साधला. महाज्योतीसारख्या संस्थेच्या परीक्षेतही अशा प्रकारचा गोंधळ होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. संपूर्ण परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी सिस्टीममध्ये बदल करण्याची गरज असल्याचेही त्यांनी म्हटले. महाज्योतीच्या स्कॉलरशिप परीक्षेच्या नियोजनातील या गोंधळामुळे विद्यार्थिनींचा वेळ आणि मेहनत वाया गेल्याने आता परीक्षा पुन्हा कधी घेतली जाणार, याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

### फी माफीची‘भीमगर्जना’,...

भावना व्यक्त होत आहे. शासनाने दिलासा म्हणून जाहीर केलेली सवलत जर प्रत्यक्षात विद्यार्थ्यांसाठी मानसिक आणि प्रशासकीय अडथळा ठरत असेल, तर या योजनेच्या अंमलबजावणीचा फेरविचार करण्याची गरज आहे.

**शासनाने तातडीने स्पष्टता द्यावी**

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करण्याचा निर्णय नेमका कोणत्या विद्यार्थ्यांना लागू आहे, शिष्यवृत्ती व फ्रीशिपधारक विद्यार्थ्यांची पात्रता काय आहे आणि हमीपत्रातील अटीचा नेमका उद्देश काय आहे, याबाबत शासनाने तातडीने स्पष्ट परिपत्रक काढावे. मुख्यमंत्र्यांची घोषणा प्रत्यक्षात उतरवायची असेल तर हमीपत्राच्या संदिग्धतेचा गुंता सोडवावा लागेल. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मदत हवी आहे, अटींच्या भूलभुलैय्यात अडकवणारी कागदोपत्री मदत नव्हे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४